# K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR

## मराठी प्रश्नपत्रिका-2023-24

**Grade: VI** **Mark:** 40
**Subject : Marathi** **Time: 2 hrs**

**विभाग 'अ'**

**प्रश्न १अ . पुढील उताऱ्याच्या आधारावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .** **(७)**

शाळेच्या परिसरात असलेल्या निंबाच्या झाडावर सुगरण पक्षी घरटे बांधत होता. अतुल, नयना, जॉन व सिमरन रोज तेथे थोडावेळ थांबायचे. सुगरण पक्षी कसे घरटे बांधतो याचे निरीक्षण करायचे. त्याच्या हालचाली त्यांचे मन मोहून टाकायच्या. 'कुठे घाई नाही, गडबड नाही, सगळे कसे नियोजनबद्ध.' असे नयना नेहमी म्हणायची. तिला त्याच्या कामातला सफाईदारपणा, नीटनेटकेपणा आवडायचा. जॉनला त्याची चिकाटी तर अतुलला त्याची कष्टाळूवृत्ती भावून जायची. सिमरनला वाटायचे, 'किती मेहनती आहे हा पक्षी ! आपल्या सुगरणीसाठी व पिलांसाठी एवढे सुरेख घरटे बांधतो. त्यासाठी अपार मेहनत घेतो. खरंच खूपच जबाबदार व कुटुंबवत्सल पक्षी आहे हा !'

१) आकृत्या पूर्ण करा:

१. सुगरण पक्षाचे निरीक्षण करणारे विद्यार्थी ------- ----

२. सुगरण पक्षी घरटे कुठे बांधत होता?

३. सिमरनला हरलेली सगरण पक्षाचे गुण वैशिष्ट्ये सांगा.

४. सुगरण पक्षी कुटुंब वत्सल कसा? ते लिहा.

५. सुगरण पक्षी बद्दल नयना नी काय मत व्यक्त केले?

६. सुगरण पक्षाचे गुणवैशिष्ट्ये सांगा.

**प्रश्न १.ब खाली दिलेल्या कवितेच्या आधारावर प्रश्नांची उत्तरे द्या.** **(७)**

पाऊस आला! पाऊस आला!
ऐन दुपारी विजा चमकल्या कडाड कडकड
भणाण वारा जिकडे तिकडे गारा, गारा.
पाऊस आला! पाऊस आला !
दिवाळीतला खचला किल्ला
भुंकत सुटली सगळी कुत्री
आजोबांनी शिवली छत्री !
पाऊस आला! पाऊस आला !
'उशीर, त्यातच हा घोटाळा'
बाबा गेले करीत चडफंड
आईचेही भिजले पापड.

प्रश्न -

१) एक दोन वाक्यात उत्तरे लिहा.

अ) विजा केव्हा चमकल्या ? आ) सुटलेला वारा कसा होता ?

२. चौकटी पूर्ण करा

अ) भुंकत सुटलेली--------- आ) छत्री शिवणारे---------

३ अचानक आलेल्या पावसामुळे दिवाळीत तुम्ही केलेल्या तयारीचे कोणते कोणते नुकसान झाले. ते लिहा.

४. रिकाम्या जागा भरा. अ) उशीर, त्यातच हा -----

**प्र.२अ. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(६)**

एका छोट्याशा गावात एक सधन शेतकरी राहत होता. शेतात काम करणाऱ्या दोन बैलजोड्या त्याच्याकडे होत्या. तसेच दोन म्हशीही होत्या आणि एक चांगली धष्टपुष्ट आणि पुष्कळ दूध देणारी 'कपिला' नावाची गायही होती. त्यामुळे त्याच्या घरी भरपूर दूधदुभते ! असे ते दूध तो साऱ्या गावात विके.एकदा अशीच सारी गुरे नीट बांधून तो शेतकरी घरात जाऊन झोपला, पण सकाळी उठून पाहतो तो त्याची गाय तिथे नव्हती. अगदी कासावीस झाला तो ! पांढरा आणि तपकिरी रंग असलेली ती गाय त्याची खूप लाडकी होती. लोक मुद्दाम गाईचे दूध-तूप, दही नेत असत आता लोकांना काय सांगणार? काय करावे? शेवटी तो शेजारच्या गावी दुसरी गाय विकत आणण्यासाठी गेला. बाजार गुरांनी भरून गेला होता.

प्र. १) आकृती पूर्ण करा.

अ) गावात राहणारा--------    आ) पुष्कळ दूध देणारी------

2) चौकटी पूर्ण करा.

अ) शेतकऱ्याच्या आवडत्या गाईचा रंग ---- ---    आ) शेतात काम करणाऱ्या------

३) एका वाक्यात उत्तरे लिहा.

अ) शेतकऱ्याकडे असलेली गाय कशी होती?

आ) लोक शेतकऱ्य कडून गाईचे कोणते पदार्थ विकत घेत असत?

**विभाग ब**

प्रश्न 2 ब .सूचनेनुसार कृती करा. (१०)

1. समानार्थी शब्द लिहा.

अ- पक्षी -    आ - वायु-

2. विरुद्धार्थी शब्द लिहा.

अ. हसणे ×    आ. काळोख ×

3 वचन बदला

अ. ढग    आ.वारे

4. खालील वाक्यात नाम ओळखा. अ. पंकज चा पहिला क्रमांक आला.

5. खालील वाक्यातील काळ ओळखा.

अ. उद्या आपल्याला आगगाडीने मामाच्या गावाला जायचे आहे.

6. खालील वाक्यात नामाचे प्रकार ओळखा.

अ हिमालय पर्वतला भारता शीर्ष स्थान प्राप्त आहे.

7.खालील शब्दांचा वाक्यप्रचार करा.    अ. चिकाटी ने काम करणे.

**विभाग - क**

प्र.3) खालील कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा (६)

१. माझ्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या

२. माझा आवडता छंद

प्र.4) खालील चित्र पाहून 100 ते 150 शब्दात चित्राचे वर्णन करा . (४)

